# एम.बी.मोरे महीला महाविद्यालयाचे मुंबई विद्यापीठात संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण

मुंबई विद्यापीठाअंतर्गत दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या अविष्कार २०१९ २० या संशोधन प्रकल्पांच्या स्पर्धेत एम.बी.मोरे फाऊंडेशनच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविद्यालय धाटाव रोहा येथील व्दितीय आणि तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या विद्यार्थीनींनी सहभाग घेऊन यश संपादन केले

महीला महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कु.दामिनी म्हसकर कु. जागृती दळवी यांनी **चुंबकीय झाडू** तसेच कु.मनाली खैर कु. विद्या काटकर यांनी **सुगंधी आयुर्वेदिक अगरबत्ती** असे दोन नाविण्यपुर्ण संशोधन प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांचे सादरीकरण पोस्टर आणि पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन या दोन स्तरावर करून परिक्षकांनी विजेत्यांची निवड केली. महीला महाविद्यालयाच्या युवा संशोधकांच्या कल्पकतेचे विद्यापीठाच्या परिक्षकांनी कौतुक केले तसेच स्पर्धेअंती यापैकी **सुगंधी आयुर्वेदिक अगरबत्ती** प्रकल्पाची निवड विद्यापीठ स्तरावर करण्यात आली.

महीला महाविद्यालयाचे अविष्कार स्पर्धेचे समन्वयक प्रा.प्रसन्न म्हसळकर आणि सहाय्यक प्रा. प्रतिमा भोईर प्राचार्य प्रा.हणमंत ढवळे आणि संस्थापक मा.श्री.विजयराव मोरे यांनी सहभागी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

